दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शनिवार, ३० मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## ठाण्याचा पारा ४० पार; जिल्हा रेड झोनमध्ये सामील होण्याचा धोका...



**■ठाणे, विशाल कारंडे :** तापमानाच्या दृष्टीने सेफ झोन म्हणून ओळखला जाणारा ठाणे जिल्हा हळूहळू डेंजर झोनकडे सरकू लागला आहे. जिल्ह्याचे तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोचत असल्याने भारतीय हवामान खात्याने या जिल्ह्यातील शासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. वाढत्या तापमानामुळे राज्याला उष्माघातापासून सुरक्षित ठेवण्यासाठी आयोजित राज्यातील आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळेत हे निर्देश देण्यात आले. ठाणे जिल्हा गेल्या काही वर्षांपूर्वी येलो झोनमध्ये (सेफ झोन) होता. या जिल्ह्याचे तापमान आणि उन्हाळ्यात (एप्रिल, मे) ३५-३७ अंशांपर्यंत जात होते. आता मात्र जिल्ह्याच्या तापमानात हळूहळू वाढ होऊन ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू लागले आहे. राज्यातील आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांसाठी गेल्या महिन्यात जळगाव येथे उष्माघाताविषयी कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत ठाणे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग सहभागी झाला होता. या कार्यशाळेत महाराष्ट्र हे देशातील उष्णतेच्या लाटेसाठी अतिसंवेदनशील राज्यांपैकी एक असल्याची माहिती देण्यात आली. पुण्याच्या भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीवर चर्चा करण्यात आली

१९५१ मध्ये ठाणे जिल्ह्याचा येला झोनमध्ये समावेश होता; मात्र आता तो २०२२ मध्ये काहीसा ऑरेंज झोनकडे सरकला असल्याचे हवामान खात्याने निदर्शनास आणून दिले आहे. आता गेल्या वर्षीपासून ठाणे जिल्ह्यातील काही भागांतील तापमान ४० अंशांपुढे गेल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे हा जिल्हा रेड झोनमध्ये सामील होण्याचा धोका संभवतो आहे. म्हणूनच जिल्ह्यात झाडांची विशेषतः बांबूच्या झाडांची लागवड करण्याच्या सूचनाही या कार्यशाळेत देण्यात आल्या होत्या. जळगाव येथे पार पडलेल्या दोनदिवसीय कार्यशाळेत पर्यावरणमंत्री अनिल पाटील, प्रादेशिक हवामान केंद्राचे उपमहासंचालक सुनील कांबळे, युनिसेफचे अधिकारी आनंद घोडके, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे राज्य हवामान कृती कक्ष संचालक अभिजित घोरपडे, कृषी विभाग प्रकल्प संचालक (निवृत्त) अनिल भोकरे, नागपूर जिल्हा अनिरुद्ध आरोग्य नागपूर जिल्हा आणि आरोग्य अधिकारी (निवृत्त) डॉ. एन. एम. राठी आदी तज्ज्ञ उपस्थित होते.

## लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकावर गुन्हा दाखल




**■मीरा रोड, सचिन कदम :** एका आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी त्याच्या भावाकडे १० लाखांची लाच मागितल्याप्रकरणी गुन्हे शाखा-१ मधील सहाय्यक पोलीस निरीक्षकावर काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कैलास टोकळे असे या लाचखोर पोलिसाचे नाव आहे. ठाण्याच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फियार्दी हे गृहरक्षक दलात कार्यरत असून भाईंदर येथे राहतात. फियार्दीच्या भावाला फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली होती.

सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा १ च्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास टोकळे (४१) यांच्याकडे होते. या प्रकरणात फियार्दीच्या भावाला जामीन मिळवून देण्यासाठी तसेच कागदपत्रे आरोपीच्या बाजूने तयार करण्यासाठी टोकळे यांनी १० लाखांच्या लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने ठाण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार सापळा लावून लाच मागितल्याचे संभाषण रेकॉर्ड करण्यात आले होते. मात्र लाचेच्या रक्कम स्विकारणाच्या वेळी टोकळे यांना संशय आल्याने ते आले नव्हते.

मात्र लाच मागितल्याचा पुराव्याच्या आधारे रात्री उशीरा काशिमिरा पोलीस ठाण्यात टोकळे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या अधिनियम १९८८ (संशोधन२०१८) च्या कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती ठाणे लाचलुचपत प्रतिंबधक विभागाचे पोलीस निरीक्षक नितीन थोरात यांनी दिली.

## 'या' जागांवर ठाकरेविरोधात उमेदवार देण्यास काँग्रेस हायकमांडचा ग्रीन सिग्नल

**■मुंबई, यश सावंत :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागावाटपावरुन महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून रस्सीखेच सुरु होती. ठाकरे गट, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्यात सांगली, रामटेक, भिवंडी यासारख्या जागांवरुन तणातणी होती. अशातच सांगली लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला. त्यानंतर आघाडीतील घटकपक्षांमध्येच आता मैत्रीपूर्ण लढती होण्याचे संकेत मिळत आहेत. महाराष्ट्रातील सांगली, भिवंडी, उत्तर पश्चिम (वायव्य) मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबई या लोकसभेच्या जागा काँग्रेसला सोडण्यास आघाडीतील मित्रपक्षांनी नकार दिला, तर इंडिया आघाडीतील घटकपक्षांविरुद्ध मैत्रीपूर्ण लढत करण्यासाठी महाराष्ट्र काँग्रेसला हायकमांडने हिरवा कंदील दाखवला आहे. महाराष्ट्र काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत शिवसेना (ठाकरे



गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यासोबत आघाडी करण्याचा निर्णय घेतला आहे, परंतु मित्रपक्षांना जागा सोडून आघाडीची किंमत मोजण्यास ते तयार नाहीत. लोकसभेच्या अशा वादग्रस्त जागांवर मैत्रीपूर्ण लढतीसाठी काँग्रेस सज्ज असल्याचं वृत्त आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीतील मित्रपक्ष एकमेकांविरुद्ध लढले, तर मतविभाजन होऊन त्याचा फटका महायुतीला होईल, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील ठाकरे गट आणि शरद पवार गटाचे नेते यावर तोडगा काढून कुठला सुवर्णमध्य काढणार का, किंवा ठाकरे गटाने जाहीर केलेल्या सांगली, उत्तर पश्चिम (वायव्य) मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबई या जागा काँग्रेसला सोडल्या जाणार का, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## घरगुती गॅस सिलेंडरचा पनवेलमध्ये काळाबाजार; सहा सिलेंडर जप्त



**■नवीमुंबई, नितीन देवळेकर :** पनवेल तालुक्यातील उसर्ली गावामध्ये घरगुती गॅसमधून गॅस चोरी करणाऱ्या एकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून अन्य एक जण पोलिसांच्या तावडीतून निसटला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे गॅसचा काळाबाजार पुन्हा उजेडात आला आहे. यापूर्वी कळंबोली येथे पोलीस उपायुक्तांनी धाड टाकून टँकरमधून गॅस चोरीचे प्रकरण उजेडात आणले होते. उसर्ली गावाजवळील शिव मंदिराशेजारील मोकळ्या जागेत गॅसचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. एका तीन आसनी रिक्षामध्ये गॅस सिलिंडरमधून गॅस काढून तो रिकाम्या काळ्या रंगाच्या बाटल्यात भरला जात असताना पोलिसांनी २१ वर्षीय मनोजकुमार बिश्नोई याला ताब्यात घेतले. मनोजचा साथीदार तेथून निसटला.

मनोज हा याच परिसरातील ओमकार इमारतीमध्ये राहतो. तो मूळचा राजस्थान येथील बिकानेर जिल्ह्यातील नानेदडा गावातील रहिवासी आहे. मनोज हा एका गॅसपुरवठा करणाऱ्या एजन्सीमध्ये कामाला आहे. पोलिसांनी रिक्षासोबत भारत गॅस कंपनीचे सहा सिलिंडर जप्त केले आहेत. तसेच पोलिसांना रिक्षात लोखंडी नळी सापडली. याच लोखंडी नळीच्या माध्यमातून मनोज व त्याचा साथीदार गॅस मोठ्या बाटल्यातून काढून लहान बाटले भरत होता. काळ्याबाजारातून मिळालेले सिलिंडर तो परिसरात विक्री करत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

या घटनेमुळे घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यामधून मिळणारा गॅस हा अपुरा पुरवठा होत असल्याची साशंकता रहिवाशांनी व्यक्त केली आहे. पनवेलमध्ये गॅसचा काळाबाजार करणारी मोठी टोळी सक्रिय असून पोलिसांसोबत जिल्ह्याच्या महसूल विभागाच्या पुरवठा विभागाने सतर्क राहण्याची गरज आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे घरगुती गॅस सिलिंडरमधून गॅस चोरी करणाऱ्या टोळीचे धाबे दणाणले आहे.पोलीस निरीक्षक अंजुमन बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे व विनोद लभडे यांनी या प्रकरणी भादंवि. २८५, ३४ सह दि लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस रेग्युलेशन सप्लाय अँण्ड डिस्ट्रिब्युशन ऑर्डर २००० ४ (१) (अ) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## पाणीबिल थकवणे पडले महागात; नळजोडण्या करणार खंडित

**■ठाणे, भावना जैन :** धो-धो पाणी वापरून बिले 'तुंबवर्णायांवर' कारवाईचा बडगा उगारण्यास ठाणे महापालिकेने अखेर सुरुवात केली आहे. पाणीपुरवठा विभागाकडून एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४ या काळात ४ हजार ४३० नळजोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. पाणीबिल भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्चपर्यंत आहे. जे ग्राहक थकबाकी आणि चालू बिल भरणार नाहीत, त्यांच्या जोडण्या तोडण्याची कारवाई १ एप्रिलपासून सुरू करण्यात येणार आहे. ठाणे पालिकेला २०२३-२४ या आर्थिक वर्षभरात २०१ कोटी रुपयांची पाणी देयके वसूल होणे अपेक्षित आहे. आतापर्यंत ११४ कोटी



रुपये वसूल झाले आहेत. ज्या ग्राहकांनी थकबाकी; तसेच चालू वर्षाची पाणी देयके जमा केलेली नाहीत, त्यांनी ३१ मार्चपर्यंत सगळी देयके जमा करून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. जे घरगुती नळसंयोजन धारक ३१ मार्चपर्यंत थकीत पाणीबिल, चालू वर्षाच्या बिलासह एकत्रित जमा करतील, त्यांना त्या थकित बिलावरील प्रशासकीय आकारातून १०० टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना ज्यांनी देयके यापूर्वीच जमा केली आहेत त्यांना; तसेच व्यावसायिक नळजोडणी धारकांसाठी लागू नाही. पुढील प्रभाग समितीनुसार पाणी देयकांची वसुली तक्ता - मुंब्रा - ९०५ ५०.६२ - कळवा - ७९६ ५५.३३ - नौपाडा-कोपरी - ६८२ ६१.४३ -वागळे - ६६० ३९.८१ - दिवा - ५५३ ३६.८५ - लोकमान्य-सावरकर नगर - ३९८ ६५.९७ - उथळसर - २८३ ६४.२४ -वर्तकनगर - ८९ ७१.५८ - माजिवडा-मानपाडा - ६४६६.६१ - एकूण - ४४३० ५६.६१


## ईस्टर्न एक्सप्रेसवरील रमाबाई आंबेडकर नगरच्या रिडेव्हलपमेंटला गती



**■मुंबई, विशाल पाटील :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रमाबाई आंबेडकर नगरच्या पुनर्वसनचे काम लवकरच सुरू करण्याची तयारी केली आहे. सध्या युद्धपातळीवर स्थानिक नागरिकांच्या सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात आले आहेत. एसआरएने एप्रिलपर्यंत सर्वेक्षण आणि बायोमेट्रिक डेटा एकत्र करण्याचे उद्दिष्ट्य समोर ठेवले आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑक्टोबरपर्यंत जमीन खाली करुन पुर्नविकासासाठी प्राधिकरणाला सोपवण्यात येणार आहे. एसआरएचे सक्षम प्राधिकारी आणि उपजिल्हाधिकारी शिवाजी दावभट यांनी दिलेल्या माहितीनुसार, फ्रीवेला ठाणेपर्यंत जाणाऱ्या मार्गात रमाबाई आंबेडकर नगरमधील एकूण १६९४ घरे मध्ये येत होती. या सर्व घरांचा बायोमेट्रिक डेटा एकत्रित करुन आणि सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आली आहे. पात्र परिवारांची यादी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणला देण्यात आली आहे. एमएमआरडीए आगामी काही दिवसांत पात्र परिवारांसोबत करार करण्याची प्रक्रिया सुरू करु शकते. उर्वरित घरांचे सर्वक्षण एप्रिलपर्यंत पूर्ण केले जाणार आहे.

मुंबईला झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी सरकारने पहिल्यांदा एसआरए आणि एमएमआरडीएला एकत्र घेऊन या प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी दिली आहे. त्याअंतर्गत घाटकोपरच्या रमाबाई नगरमध्ये सर्वेक्षण करण्याचे आणि जमीन खाली करण्याची जबाबदारी एसआरएला देण्यात आली आहे. तर, रमाबाई नगरमध्ये बिल्डिंग उभारण्याचे काम एमएमआरडीएकडे सोपवण्यात आले आहे. सरकारने या प्रकल्पाच्या माध्यमातून रमाबाई नगरजवळ १५ हजार घरांच्या रिडेव्हलपमेंटचा प्लान तयार केला आहे. सवेर्चे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी ६ पथके तैनात केले आहेत. एका टीममध्ये ५ सदस्य आहेत. जे सर्वेक्षणाबरोबरच बायोमेट्रिक डेटा एकत्रिक करत आहेत. घाटकोपरच्या रमाबाई आंबेडकर नगर पुर्नविकास प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईत घरांची संख्याही वाढणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक पात्र नागरिकांना मोफत घरे उपलब्ध करुन देणार आहेत. त्याचबरोबर ५ हजार अतिरिक्त घरांचे निर्माण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळं मुंबईत घरे निर्माण होणार आहेत. अतिरिक्त घरांची बाजारात विक्री केली जाणार आहे. या प्रोजक्टमधून तयार होणाऱ्या घरांची विक्री म्हाडा आणि सिडकोप्रमाणे होणार आहे. एमएमआरडीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अतिरिक्त घरांची विक्री ही सरकारी संस्थांप्रमाणेच होणार आहे. यावर अंतिम निर्णय अद्याप झालेला नाहीये. मात्र घरांची विक्री लॉटरी पद्धतीनेच होणार आहे.

## १२ दिवसांत सागरी किनारा मार्गावर सव्वादोन लाखांहून अधिक वाहनांची ये-जा



**■मुंबई, दिगंबर जाधव :** मुंबई महानगरपालिकेचा बहुप्रतिक्षित मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाची वरळी ड्ठ मरिन ड्राईव्ह दक्षिण वाहिनी मार्गिकेवरून गेल्या १२ दिवसांमध्ये तब्बल सव्वादोन लाखांहून अधिक वाहनांनी प्रवास केला. त्यातही सकाळी १० ते दुपारी १२ यावेळेत या मार्गावरून जाणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त होती. धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाची वरळी ड्ठ मरिन ड्राईव्ह दक्षिण वाहिनी मार्गिका १२ मार्चपासून सर्वसामान्यांसाठी खुली झाली. बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित अशा या मार्गाबाबत मुंबईकरांना प्रचंड उत्सुकता होती. या मार्गावरून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत वाहतूक सुरू असते. तसेच शनिवारी आणि रविवारी हा मार्ग वाहतुकीसाठी बंद असतो. दुसऱ्या मार्गिकेच्या कामासाठी हा मार्ग बंद ठेवण्यात येतो. आतापर्यंत या मार्गिकेवरून तब्बल २ लाख २५ हजार ५५८ वाहनांनी प्रवास केला. यामध्ये सकाळी १० नंतर वाहनांची संख्या सर्वाधिक असते. सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत सर्वाधिक वाहने या मार्गावरून जातात. नंतर पुन्हा दुपारी ३ ते ४ या वेळेतही वाहनांची संख्या अधिक असते. सागरी किनारा मार्गावर येण्यासाठी वरळीतील बिंदू माधव ठाकरे चौक, रजनी पटेल चौक आणि भुलाबाई देसाई रोड येथून प्रवेश करता येतो. तसेच अमरसन्स उद्यान, भुलाबाई देसाई रोड आणि मरिन ड्राईव्ह येथे बाहेर पडण्यासाठी मार्ग आहेत. तीन प्रवेशमार्ग असल्यामुळे बोगद्यातून मरिन ड्राईव्ह येथे बाहेर पडणाऱ्या वाहनांची मोजणी करण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. सागरी किनारा मार्गावर सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत प्रवेश दिला जात आहे. मात्र, वरळी सी फेस परिसरातील बिंदू माधव ठाकरे चौकातील प्रवेश मार्गावर संध्याकाळी प्रचंड वाहतूक कोंडी होते. संध्याकाळच्या वेळी उपनगरात जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असते. त्यामुळे वरळीतील या प्रवेशमार्गावरून संध्याकाळी ५ पर्यंतच प्रवेश दिला जातो.

## वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पोलिसांचा 'मास्टर प्लॅन'



**■पुणे, अभिजीत येरुल्लू :** शहराचा वाढता विस्तार, वाहनांची संख्या यासह सर्व बाबी लक्षात घेउन वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी पुणे पोलिसांकडून नियोजन करण्यात येत आहे. त्यात तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविण्यात येतील. आगामी २० वर्षांतील संभाव्य परिस्थितीच्या अनुषंगाने विस्तृत वाहतूक आराखडा (मास्टर प्लॅन) तयार करून तो राज्य सरकारला पाठविण्यात येईल, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. शहरातील वाहतुकीच्या समस्येबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे. या अनुषंगाने पोलिस आयुक्तालयात जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, मेट्रो, पीएमआरडीए, स्मार्ट सिटीच्या प्रमुखांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीतील चचेर्नंतर शहर पोलिसांनी वाहतूक समस्येवर उपाययोजना करण्याबाबत उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यानुसार अशास्त्रीय आणि अनावश्यक गतिरोधक काढणे, इंडियन रोड काँग्रेसच्या (आयआरसी) निकषांनुसार नवीन गतिरोधक तयार करणे, दुभाजकांमधील पंक्चर बंद करणे. अवजड वाहनांना शहरात मार्गक्रमण करण्यास बंदी, कोंडीचे हॉटस्पॉट शोधून सुधारणा करणे अशा तातडीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी पहिल्या टप्प्यात १५ प्रमुख रस्ते आणि चौकांची निवड केली आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील आणि वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त रोहिदास पवार यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वाहतूक शाखेतील सर्व पोलिस अधिकारी, कर्मचारी आणि ट्रॅफिक वॉर्डन यांना वाहतूक नियमनाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. सध्या ट्रॅफिक वॉर्डनची संख्या ४४० इतकी आहे. ही संख्या एक हजारापर्यंत नेण्यात येणार आहे. वाहनांच्या वर्दळीच्या कालावधीत वाहतूक नियमनावर भर देण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे अमितेश कुमार यांनी सांगितले. शहरातील वाहतूक नियमन योग्य पध्दतीने करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करण्यात येणार आहे. शहरात ७५० प्रमुख चौक आहेत. त्यापैकी तीनशे ठिकाणी सिग्नल असून, त्यात जवळपास शंभर स्वयंचलित सिग्नल आहेत. शहरात लेजर आणि रडार वर आधारित सिग्नल व्यवस्था उभारण्यात येणार आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहने नसल्यास लाल सिग्नलला थांबण्याची गरज भासणार नाही. तेथील स्वयंचलित सिग्नल हिरवा होईल. तसेच, सीसीटीव्हीच्या माध्यमातून ट्रिपल सीट, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, विनाहेल्मेट दुचाकीस्वार, सीटबेल्ट न बांधणे अशा प्रकारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे. पार्किंगची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. इमारतीमधील पार्किंगचा वापर व्यवसाय किंवा इतर कारणांसाठी केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर एमआरटीपी कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

## १५ एप्रिलपासून नालेसफाईची कामे सुरू करण्याचे ठाणे आयुक्तांचे आदेश

**■ठाणे, रोहित जैसवाल :** नालेसफाईची निविदा प्रक्रिया पूर्ण करून १५ एप्रिलपासून महापालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे सुरू करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मान्सूनपूर्व आढावा बैठकीत दिले. त्याचबरोबर, अतिधोकादायक इमारती रिकाम्या करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या. मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सर्व उपायुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे यांनी मान्सूनच्या काळात महापालिकेच्या विविध विभागांवर असलेल्या जबाबदाऱ्या, त्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था याबद्दल सादरीकरण केले. या बैठकीत, नालेसफाईची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्याबद्दल उचित कार्यवाही करून ही प्रक्रिया तातडीने



पूर्ण करावी. तसेच, १५ एप्रिलपासून नालेसफाई प्रत्यक्षात सुरू केली जावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. त्याचबरोबर, महापालिका क्षेत्रातील ८६ अती धोकादायक इमारतींचा तातडीने आढावा घेण्यात यावा, इमारत अतिधोकादायक असल्याबद्दल काही वाद असतील आणि त्यात त्रयस्थ संस्थेकडून लेखापरिक्षण करून घेण्यात येणार असेल तर तेही लगेच केले जावे. त्याच्या अहवालाचा पाठपुरावा करावा. अती धोकादायक इमारतीत रहिवासी रहात असतील तर त्या इमारती रिकाम्या करण्यासाठी आतापासूनच प्रयत्न करावेत. माणुसकीचा दृष्टीकोन ठेवून प्रत्येक इमारतीसाठी स्वतंत्र उपाययोजना करावी. अती धोकादायक इमारतींबाबत जनजागृती करावी, इमारत जीर्ण होत असेल तर त्यात कोणकोणती लक्षणे दिसतात, याचीही माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात यावी, अशी सूचनाही आयुक्त श्री. राव यांनी केली. मान्सूनच्या काळात सर्व प्रमुख अधिकारी, आपत्कालीन सेवेत ज्यांच्यावर जबाबदारी आहे, असे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे मोबाईल कायम संपर्क क्षेत्रात राहतील आणि त्यावर तत्काळ प्रतिसाद दिला जाईल, याची दक्षता घेण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने

तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.





**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.



**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये ‘ई’ जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील ‘अ’ जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.

# शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

**आपल्याला** निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात.



काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात.

# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support. google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

# ‘सातव्या मुलीची सातवी मुलगी’ मालिकेने गाठला ५०० भागांचा टप्पा, कलाकारांनी साजरा केला खास क्षण

झी मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिकांपैकी एक ह्यसातव्या मुलीची सातवी मुलगीह्ण मालिका आहे. सप्टेंबर २०२२ रोजी सुरू झालेल्या या मालिकेने आता लोकप्रियतेची एक वेगळी उंची गाठली आहे. मालिकेतील प्रत्येक कलाकारांनी आपआपले पात्र उत्तमरित्या निभावलं आहे. त्यामुळे प्रेक्षकांनाही ती पात्र आपलीशी वाटतं आहेत. मालिकेने आता ५०० भागांचा टप्पा गाठला असून हा खास क्षण जोरदार साजरा करण्यात आला. याचे फोटो, व्हिडीओ व्हायरल होतं आहेत.

अभिनेत्री तितीक्षा तावडे व अभिनेता अजिंक्य ननावरे यांची प्रमुख भूमिका असलेली सातव्या मुलीची सातवी मुलगी ही मालिका वेगळ्या कथानकामुळे प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली आहे. या मालिकेतील नायिका असो किंवा खलनायिका प्रत्येक पात्रावर प्रेक्षक भरभरून प्रेम करत आहे. आज मालिकेने ५०० भागांचा टप्पा पूर्ण केल्यानिमित्ताने सेलिब्रेशन करण्यात आलं. यावेळी मालिकेतील कलाकार मंडळींसह संपूर्ण टीम उपस्थितीत होती.दोन मोठे केक कापून ह्यसातव्या मुलीची सातवी मुलगीह्ण मालिकेच्या टीमने हा खास क्षण साजरा केला. यावेळी सगळ्या टीमला खास भेटवस्तू देण्यात आली. याशिवाय तुषार देवलने मालिकेचं शीर्षक गीत गायलं. याचा व्हिडीओ अभिनेत्री एकता डांगर हिने शेअर केला आहे.

दरम्यान, ह्यसातव्या मुलीची सातवी मुलगीह्ण या मालिकेत तितीक्षा, अजिंक्य व्यतिरिक्त ऐश्वर्या नारकर, सुरुची अडारकर, श्वेता मेहेंदळे, राहुल मेहेंदळे, मुग्धा गोडबोले-रानडे, रजनी वेलणकर, जान्हवी किल्लेकर, अमृता रावराणे, अनिरुद्ध देवधर, प्रशांत केणी, असे अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.




# ‘फुलाला सुगंध मातीचा’ फेम अभिनेत्री झळकणार ‘स्टार प्रवाह’च्या लोकप्रिय मालिकेत, साकारणार महत्त्वाची भूमिका



'स्टार प्रवाह'च्या लोकप्रिय मालिकेत नव्या रुपात पाहायला मिळणार 'ही' प्रसिद्ध अभिनेत्री स्टार प्रवाह वरील फुलाला सुगंध मातीचा ही मालिका चांगलीच गाजली होती. या मालिकेतील प्रत्येक पात्राने प्रेक्षकांची मनं जिंकली होती. कीर्ती-शुभमची जोडी तर हीट झाली होती. त्याबरोबरच इतर पात्रांना देखील प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं होतं. आता यामालिकेतील एक प्रसिद्ध अभिनेत्री स्टार प्रवाह च्या लोकप्रिय मालिकेत झळकणार आहे. फुलाला सुगंध मातीचा मालिकेतील जीजीअक्का पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. अभिनेत्री अदिती देशपांडे यांनी जीजीअक्काची भूमिका उत्कृष्टरित्या साकारली होती. आता अदिती देशपांडे नव्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. स्टार प्रवाह ची लोकप्रिय मालिका लग्नाची बेडी मध्ये अदिती देशपांडे झळकणार आहेत. गेल्या दोन वर्षांपासून प्रेक्षकांचं मनोरंजन करत असलेल्या लग्नाची बेडी मालिकेत अदिती या महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहेत. दरम्यान, लग्नाची बेडी ही मालिका लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. सायली देवधर, रेवती लेले, संकेत पाठक, मिलिंद अधिकारी असे अनेक कलाकार आहेत. आता या कलाकारांच्या मांदियाळीत अदित देशपांडे नव्या भूमिकेतून पाहायला मिळणार आहेत. याआधी अदिती देशपांडे यांनी अनेक मराठी, हिंदी मालिकांमध्ये काम केलं आहे. याशिवाय त्यांचे बरेच मराठी चित्रपट सुपरहिट झाले आहेत. जोगवा , रेगे, पक पक पकाक ,नॉट ओन्ली मिसेस राऊत यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.

## दैनिक लोकरक्षणाय सुडोकू - ४४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 3 | | | 1 | | 8 | |
| 9 | 5 | 7 | 4 | | | 6 | | |
| 4 | | | | 3 | | | | |
| | 7 | | 1 | 4 | | | 2 | |
| | | | 2 | | | | | 8 |
| 6 | | | 5 | 8 | | | 3 | 4 |
| 1 | 3 | | | 5 | | | 4 | |
| 5 | 8 | 9 | | | | 2 | | |
| | | | | 9 | 6 | | | |

## उत्तर सुडोकू -४३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 6 | 3 | 1 | 9 | 4 | 7 | 2 | 5 |
| 7 | 9 | 4 | 2 | 3 | 5 | 6 | 1 | 8 |
| 1 | 5 | 2 | 6 | 7 | 8 | 4 | 9 | 3 |
| 9 | 8 | 6 | 3 | 2 | 7 | 5 | 4 | 1 |
| 2 | 7 | 5 | 4 | 1 | 6 | 8 | 3 | 9 |
| 3 | 4 | 1 | 8 | 5 | 9 | 2 | 6 | 7 |
| 4 | 1 | 9 | 5 | 8 | 2 | 3 | 7 | 6 |
| 6 | 3 | 8 | 7 | 4 | 1 | 9 | 5 | 2 |
| 5 | 2 | 7 | 9 | 6 | 3 | 1 | 8 | 4 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### ३० मार्च

- १६६५: पुरंदर किल्ल्यावर दिलेरखानाशी लढताना वीर मुरारजी धारातीर्थी पडले.
- १७२९: थोरले बाजीराव पेशवे यांनी जैतपूर येथे महंमदशहा बंगश याचा पराभव केला.
- १८४२: अमेरिकन शल्यविशारद डॉ. क्रॉफर्ड लाँग यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी इथर या द्रव्याचा प्रथमच वापर केला.
- १८५६: पॅरिसचा तह झाल्याने क्रिमियन युद्ध संपले.
- १९२९: भारत व इंग्लंडदरम्यान हवाई टपालसेवा सुरू झाली.
- १९३९: हेइंकेल १०० ह्या सैनिकी विमानाने ७४५ किमी / ताशी वेगाने उडण्याचा विक्रम केला.
- १९४४: दुसरे महायुद्ध झ दोस्त राष्ट्रांनी सोफिया, बल्गेरिया येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
- १८५३: डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉग यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै १८९०)
- १८९४: इल्युशीन विमान कंपनी चे निमार्ते सर्जी इल्युशीन यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९७७)
- १८९५: सोविएत युनियनचे अध्यक्ष निकोलाय बुल्गानिन यांचा जन्म. (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९७५)
- १८९९: बंगाली लेखक शरदेंन्दू बंदोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९७०)
- १९०६: भारतीय भूदलाचे ६ वे सरसेनापती जनरल कोडेन्डेरा सुबय्या तथा के. एस. थिमय्या यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १९६५)
- १९०८: अभिनेत्री देविका राणी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९९४)
- १९३८: वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम चे स्थापक क्लाउस स्च्वाब यांचा जन्म.
- १९४२: भाषातज्ज्ञ, कोशकार, लेखक आणि कवी वसंत आबाजी डहाके यांचा जन्म.
- १९७७: भारतीय संचालक आणि पटकथालेखक अभिषेक चोब्बे यांचा जन्म.
- १९५२: भूतानचे २ रे राजे जिग्मे वांगचुक यांचे निधन.
- १९६९: कवी व समाजसेवक वासुदेव गोविंद मायदेव यांचे निधन. (जन्मः २६ जुलै १८९४)
- १९७६: चित्रकार रघुवीर मूळगावकर यांचे निधन. (जन्मः १४ नोव्हेंबर १९१८)

## भविष्य

**मेष** दूरच्या प्रवासाचा योग येईल. जास्त धाडस करू नका. व्यावसायिक प्रगतीचे दर उघडेल. सर्वांशी गोडीगुलाबीने वागाल.

**वृषभ** व्यावसायिक बदलाचे वारे मनात वाहू लागतील. कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. मुलांकडून चांगल्या बातम्या मिळतील.

**मिथुन** मनातील आकांक्षा विनासायास पूर्ण होतील. तरुण वगार्ने कसलीही घाई करू नये. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी.

**कर्क** महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यावी. वरिष्ठांना नाराज करू नका. धार्मिक कायार्चा लाभ घ्यावा. भावंडांची काळजी लागून राहील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

**सिंह** तुमचा मनमोकळा स्वभाव इतरांच्या नजरेत भरेल. वरिष्ठांच्या शाबासकीस पात्र व्हावे. प्रेमप्रकरणातील जवळीक त्रासदायक ठरू शकते. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे.

**कन्या** मुलांचा व्रात्यपणा वाढू शकतो. कामात चिकाटी ठेवावी लागेल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल. जुन्या कामातून लाभ संभवतो. अति अपेक्षा बाळगू नका.

**तुला** हाती सोपवलेले काम वेळेत तडीस न्याल. कामात कसलीही घाई उपयोगाची नाही. डोके ठिकाणावर ठेवून वागावे. कौटुंबिक बाजू ध्यानात घेऊन वागावे. घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

**वृश्चिक** जोडीदाराशी अनबन टाळावी. स्वकष्टाने आर्थिक बाजू सुधाराल. आपल्या वागण्याने कोणी दुखवणार नाही याची काळजी घ्यावी. सत्य-असत्याची खातरजमा करावी.

**धनु** बाह्यरुपावर भुलू नका. काटकसरीचा मार्ग अवलंबाल. नवीन आव्हानाला सामोरे जाल. तुमची काम करण्याची शक्ति वाढेल. तुमचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

**मकर** सर्वांशी मधुर वाणीने बोलाल. कौटुंबिक जबाबदारी वाढू शकते. तुमच्या संभाषणाची उत्तम छाप पडेल. कामात अधिक उत्साह येईल. तुमची महत्त्वाकांक्षा वाढीस लागेल.

**कुंभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. काही गोष्टींचे धोरण ठरवावे लागेल. सामाजिक गोष्टींची जाणीव ठेवावी. गुरूजनांचा आशीर्वाद लाभेल. तुमची मानमान्यता वाढेल. फसवणुकीपासून सावध राहावे.

**मीन** नैराश्याला बळी पडू नका. फसवणुकीपासून सावध राहावे. मैत्रीचे नाते जपावे. जमिनीच्या कामास गतीमानता येईल. अति श्रमाचा थकवा जाणवेल. जवळचा प्रवास घडेल. जोडीदाराविषयी मतभेद संभवतात.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)


## संपादकीय

# अब मजा आएंगा!

अमरावतीत भाजपने अपक्ष खासदार नवनीत राणा यांना उमेदवारी दिल्याने शिंदे गटाचे आनंदराव अडसूळ आणि अपक्ष बच्चू कडू यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. बच्चू कडू यांनी तर राणा यांच्या उमेदवारीवरून अब मजा आयेगा असे म्हणत थेट भाजपला आव्हान दिले आहे. महायुतीत जागावाटपावरून सुरू असलेल्या असंतोषाला कडू यांनी वाट मोकळी करून दिली आहे. येत्या काही दिवसात त्याचा उद्रेक झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. भाजपला नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसवायचे आहे. त्यासाठी देशभरात भाजपने फोडाफोडीचे राजकारण जोरात सुरू केले आहे. काँग्रेसमुक्त भारताचा नारा देणारी भाजप काँग्रेसजनांना भाजपमध्ये घेत त्यांना थेट उमेदवारी देत आहे. त्यामुळे भाजपमधील काही नाराज वरिष्ठ नेते, मंत्री निवडणुकीपासून दूर होऊ लागले आहेत. काही विद्यमान मंत्री आणि खासदारांनी पुन्हा निवडणूक न लढण्याचा निर्णयही घेतला आहे, पण त्याची भाजप श्रेष्ठींना काही फिकीर नाही. नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदावर बसवतानाच चारशेहून अधिक खासदार निवडून आणण्याचेही भाजपचे स्वप्न आहे. चारशेहून अधिक खासदार निवडून आणण्याचा विक्रम राजीव गांधी यांनी केला होता. त्यावेळी एकट्या काँग्रेसचे ४१४ खासदार निवडून आले होते. तो विक्रम आतापर्यंत कुणालाही मोडता आलेला नाही. भाजपने अबकी बार चारसौ पारचा नारा दिला असला तरी एनडीएशिवाय हा आकडा पार करणे भाजपला सोपे नाही. म्हणूनच भाजपकडून स्वबळावर चारशेहून अधिक खासदार निवडून आणू, असे म्हटले जात नाही. हे गणित जुळवून आणण्यासाठी भाजप सर्वशक्तींचा वापर करून विरोधकांना जेरीस आणताना दिसत आहे. काँग्रेसमुक्त भारताचा नारा देणारे भाजपचे नेते विविध राज्यात काँग्रेसच्या नेत्यांनाच आपल्या छत्रछायेखाली घेऊ लागले आहेत. त्याचे ज्वलंत उदाहरण हरयाणा राज्यातील देता येईल. याठिकाणी लोकसभेच्या फक्त दहा जागा आहेत. त्यातील सहा जागांवर भाजपच्या कमळचिन्हावर काँग्रेसमधून आलेल्या नेत्यांचा समावेश आहे. पंजाबमध्ये काँग्रेस आणि आपच्या प्रत्येकी एकेका खासदाराला भाजपने आपल्याकडे घेऊन लोकसभेची उमेदवारी दिली आहे.

महाराष्ट्रात भाजपचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताकदीवर फारसा भरवसा नसल्याचे दिसू लागले आहे. काँग्रेसमधून आलेल्या आमदार राजू पारवे यांना रामटेकमधून लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेच्या शिंदे गटातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यासाठी शिंदेंसोबत आलेले शिवसेनेचे खासदार कृपाल तुमाने यांचा मात्र बळी देण्यात आला आहे. शिंदे गट भाजपच चालवत असल्याचे दिसू लागल्याने शिंदेंसोबत आलेल्या खासदारांसोबत भविष्यातील विधानसभा निवडणुकीवर लक्ष ठेऊन असलेल्या आमदारांचीही धाकधूक वाढली आहे. नाशिकमध्ये शिंदे गटाचे हेमंत गोडसे विद्यमान खासदार आहेत. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये जाऊन गोडसे यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर भाजपकडून त्यांना कडवा विरोध केला होता. प्रारंभी भाजपने या जागेवर दावा केला होता. आता राष्ट्रवादी आणि मनसेकडून दावा केला जात आहे. मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाचे आंदोलन पेटवले होते, तेव्हा भाजपची कुणबी वोटबँक धोक्यात येण्याची भीती होती. त्यावेळी एकमेव छगन भुजबळ जरांगे-पाटील यांच्याविरोधात मैदानात उतरले होते. मराठा समाजाचा रोष पत्करत भुजबळ महाराष्ट्रभर फिरले होते. तेव्हा भाजप, शिंदे गट, अजित पवार गटाच्या नेत्यांची मराठा आंदोलनाविरोधात बोलायची हिंमत झाली नव्हती. ती हिंमत दाखवलेल्या छगन भुजबळ यांना बक्षिसी म्हणून भाजप राष्ट्रवादीकडून नाशिक लोकसभेची उमेदवारी देण्याच्या तयारीत आहे. राष्ट्रवादीने सातारावर दावा केला असून त्याबदल्यात नाशिकची जागा सोडली, असे सांगून शिंदे गटाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघ अजित पवार गटाला देताना सुनेत्रा पवार यांनाच उमेदवारी देण्याची अट घालून भाजपने पवार कुटुंबात संघर्षाची ठिणगी पेटवली आहे. बारामतीमधील शरद पवारांचे साम्राज्य उलथवून टाकण्याचा भाजपचा गेल्या अनेक वर्षांपासूनच प्लान असून अजित पवारांच्या माध्यमातून तो प्रत्यक्षात आणण्याची भाजपची रणनीती आहे. यावरबरोबर बारामतीच्या जागेवरून शिंदे आणि पवार गटातच वादाची पेरणी करण्याचे कामही झाले आहे. ॲक्शनला रिॲक्शन हा निसर्गाचा नियमच आहे. स्वपक्षीयच नव्हे, तर शिंदे-पवार गटाला दाबण्याची भाजपची रणनीती त्यांच्याच अंगलट येऊ शकते, हे अमरावतीत विद्यमान अपक्ष खासदार नवनीत राणा यांना भाजपमध्ये घेऊन थेट उमेदवारी दिल्यावरून सुरू झालेल्या नाराजी नाट्याने समोर आले आहे. अभिजित अडसूळ यांनी विरोध सुरू केला आहे. अपक्ष आमदार बच्चू कडू यांनी भाजपला आव्हान दिले आहे. नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्राचा अंतिम निकाल अद्याप आलेला नाही. सर्वोच्च न्यायालयात तो अजूनही प्रलंबित आहे. त्यावरही कडू यांनी नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालय नव्हे पक्षालय असा आरोप करताना लोकशाही सोडून हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. पक्ष कार्यालय फोडणाऱ्यांना उमेदवारी देण्याची लाचारी भाजपवर आली असून हे दुर्दैवी असल्याचेही कडू यांनी म्हटले आहे. त्याचवेळी राणांविरोधात काम करणार, असा इशारा देत अब मजा आयेगा, असा इशारा भाजपला दिला आहे. भाजपच्या कार्यपद्धतीविरोधात कडू यांच्या बंडाची ठिणगी वणव्यात रूपांतरित झाली, तर भाजपला महागात पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# तीन पिढ्यांचा तमाशा!



आज अनेकांस ठाऊकही नसेल पण एकेकाळी या राज्यातील लक्ष्मणराव बळवंत फाटक नामे निवृत्त रेल्वे कारकुनास सरकारी कंत्राटांसाठी एक कंपनी काढावीशी वाटली आणि एका जैन परिचिताच्या साहाय्याने त्याने ती खरोखरच काढली. देशभर नावलौकिक मिळवणाऱ्या कल्याणी कुटुंबातील मतभेद एका वेदनादायी प्रश्नास जन्म देतात, तो म्हणजे मराठी उद्योगांचे हे असे का होते? आज अनेकांस ठाऊकही नसेल पण एकेकाळी या राज्यातील लक्ष्मणराव बळवंत फाटक नामे निवृत्त रेल्वे कारकुनास सरकारी कंत्राटांसाठी एक कंपनी काढावीशी वाटली आणि एका जैन परिचिताच्या साहाय्याने त्याने ती खरोखरच काढली. मुंबई-पुणे बोरघाटातील बोगद्यासह अनेक ऐतिहासिक रेल्वे कामे या फाटकांच्या कंपनीने केली. पण दोघांचे बिनसल्यानंतर ही कंपनी टाटा समूहात विलीन झाली. या फाटक यांच्या सहकारी भागीदाराचे नाव वालचंद हिराचंद. फाटक यांस अशी काही कल्पना सुचायच्या आधी याच राज्यातील एका तरुणास मुंबईतील जेजे कला महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असे वाटले.

पण जन्मजात रंगांधळेपणाच्या दोषामुळे त्यास कला शाखा सोडावी लागली. तथापि आरेखनाचा ध्यास स्वस्थ बसू देईना. त्यातूनच त्याने आसपासच्या शेतकऱ्यांस कायमस्वरूपी वापरता येईल असा पोलादी नांगर बनवला. पण यातून जमिनीस विषबाधा होते या भीतीने शेतकरी तो वापरेनात. त्यांच्या मनातील ही अंधश्रद्धा दूर करण्यात या तरुणाची दोन वर्षे गेली आणि नांगर उद्योगासाठी जागा शोधण्यात आणखी काही काळ गेला. अखेर औंधच्या पंतप्रतिनिधींनी या तरुणास माळरान आंदण दिले आणि तेथेच देशातील पहिली औद्योगिक नगरी उभी राहिली. तिचे नाव किर्लोस्करवाडी आणि ती स्थापणारे लक्ष्मणराव किर्लोस्कर. त्याहीआधी त्याच परिसरात धनजीशा बोमनजी कूपर नामक धडपड्या युवकाने स्वतंत्र कारखाना काढला आणि १९३४ साली देशातील पहिले डिझेल इंजिन तेथे तयार झाले. हे सारे पाहून आणखी एकास पोलादाच्या क्षेत्रात असेच काही करण्याची ऊर्मी निर्माण झाली आणि त्याने महाराष्ट्र जन्मास येत असताना ओतीव पोलादाचा कारखाना काढला. स्वतःचा तरुण अभियंता मुलगा महिना ५०० रुपये पगारावर या कंपनीत त्याने कामास ठेवला. आज नीलकंठराव कल्याणी यांची भारत फोर्ज ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची पोलादी साचे बनवणारी कंपनी आहे आणि त्या वेळी ५०० रुपये वेतनावर काम करणारा नीलकंठरावांचा मुलगा बाबा कल्याणी यांच्या नेतृत्वाखाली या कंपनीची उलाढाल ३०० कोटी डॉलर्सवर गेली आहे. अर्थात या उद्योगांची गौरवगाथा सांगणे हे येथे प्रयोजन नाही. तर यातील बहुतांश उद्योग हे कसे कौटुंबिक कलहाचा दुभंग अनुभवतात याची चर्चा करणे हा येथील उद्देश. एकेकाळी देशभर नावलौकिक मिळवणाऱ्या या सर्वच मराठी उद्योजकांच्या आकसण्यास केवळ कौटुंबिक कलह हेच कारण आहे असे नाही. हा कुटुंब कलहाचा मुद्दा येतो तो उफाळून आलेल्या कल्याणी कुटुंबातील मतभेदांमुळे. इतके दिवस बाबा कल्याणी आणि त्यांच्या भगिनीतील मतभेद आता पुढच्या पिढीकडे संक्रमित झाले असून मामा-भाचे, काका-पुतणे या पातळींवरही चकमकी सुरू झाल्याचे दिसते. बाबांचे तीर्थरूप नीलकंठ कल्याणी यांचे प्रेरणास्थान असलेल्या किर्लोस्कर समूहात तर केवळ भावा-भावांतच नव्हे तर मायलेकरातही विसंवाद आहे. किर्लोस्कर उद्योगाचा व्यापही आता मर्यादित क्षेत्रांपुरता दिसतो. पुण्यातील गरवारे समूहाचे नाव आता फारसे कानी येत नाही. प्लास्टिक हा शब्ददेखील कोणास माहीत नव्हता त्या वेळी जुन्या मोटारींच्या व्यवसायात असलेले आबासाहेब गरवारे प्लास्टिक उद्योगात शिरले आणि त्यांनी मोठी भरारी घेतली. आज या क्षेत्रावर रिलायन्सचा अंमल चालतो. एकेकाळी यातील वालचंद समूह रावळगाव शुगर, इंडियन ह्युम पाइप, विमान-मोटार निर्मिती, बंदर, चित्रपट निर्मिती इत्यादी कित्येक क्षेत्रांत होता. आज त्यातील अजित गुलाबचंद यांच्या नेतृत्वाखालील हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन्स कंपनी (एचसीसी) आपला आब राखून आहे.

आज मार्गनामामुळे ओळखले जाणारे अप्पासाहेब मराठे, कॅम्लिनचे संस्थापक दांडेकर बंधू, विको वज्रदंतीकार पेंढरकर, आगाशे, आपटे आदी काही मराठी उद्योग घराण्यांचा दाखला येथे देता येईल. यात कॅम्लिन आणि दांडेकर हे नाते आता पहिल्यासारखे नाही. विको मात्र पतंजलीदी नव्या आव्हानांच्या गर्दीत आपले अस्तित्व चांगल्या प्रकारे टिकवून आहे. हा इतिहास एका वेदनादायी प्रश्नास जन्म देतोः मराठी उद्योगांचे हे असे का होते? ज्या वेळी देशातील अन्य प्रांत अजगरासारखे सुस्त होते त्यावेळी पुण्यात महादेव बल्लाळ नामजोशी नामे तरुणाने किरण हे केवळ अर्थविषयास वाहिलेले नियतकालिक काढले होते आणि त्यात केशव साठ्ये नामे तेथील पोलाद व्यापाऱ्याची आर्थिक गुंतवणूक होती. टिळक-आगरकर यांच्या केसरी झंझावातातही किरण प्रभा प्रभावी होती. याच पुण्यात टिळकांनी विसावे शतक उगवलेही नव्हते तेव्हा मराठी माणसांस जॉइंट स्टॉक कंपन्या काढा असा सल्ला दिला होता आणि जर्मनीतील लघुउद्योजकांचे अनुकरण करण्याची सूचना केली होती. खुद्द टिळकांनीही अर्थविकासाचे महत्त्व लक्षात घेऊन काच कारखानादी उद्योग स्थापण्यात सक्रिय सहभाग घेतला. त्याच पुण्यातील नामदार गोपाल कृष्ण गोखले हे अर्थज्ञानासाठी ओळखले जात आणि पुढे त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकत धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्यांनी अर्थकारणास नवी दिशा दिली. तथापि आज त्याच पुण्यात नाव घ्यावेत असे मराठी उद्योजक किती असतील? खरे तर याच पुण्यात इन्फोसिस या विख्यात कंपनीचा जन्म. याच पुण्यात नंदन निलेकणी आणि सुधा व नारायण मूर्ती आदींनी इन्फोसिसची मुहूर्तमेढ रोवली. पण ती कंपनी पुढे रुजली, वाढली मात्र बेंगळूरुत. एखाद्या नदीने उगमस्थळापेक्षा दूरवरच्या प्रांतालाच आनंद शिंपण करावे तसे हे. आज पर्सिस्टंटचे आनंद देशपांडे, प्राज चे प्रमोद चौधरी हे काही या पुण्यभूतील सन्माननीय अपवाद. बाकी तसा आनंदी-आनंदच!

वेदनादायक बाब ही की हे मराठीचे दुर्भिक्ष केवळ उद्योग क्षेत्रापुरतेच नाही. दिल्ली वा अन्य प्रांतातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे क्षेत्र असो वा बँकिंग असो वा खासगी कंपन्यांतील मुख्य कार्यकारी अधिकारी पदांवरील व्यक्ती असोत. मराठी नावे औषधालाही सापडत नाहीत. किंवा सापडली तर औषधापुरतीच आढळतात. एकेकाळी सरकारी मालकीच्या राष्ट्रीयीकृत बँकांत उत्तम मराठी टक्का होता. सरकारी भ्रष्टाचारास ताठ मानेने विरोध करून पदत्याग करणारे स्टेट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक मनोहर भिडे, संस्कृत वाङ्मय ते नाट्यसंगीत अशा अनेक क्षेत्रांत विहरणारे महाराष्ट्र बँकेचे वसंतराव पटवर्धन वा सेंट्रल बँकेचे मोहनराव टांकसाळे अशी अनेक नामांकित मराठी व्यक्तिमत्त्वे बँकिंग क्षेत्रात होती. ही पदे राहिली दूर. आज अनेक बँकांत मराठी कारकून आढळला तरी आनंदी आनंद गडे म्हणावेसे वाटेल. याहूनही अधिक वेदनादायी बाब म्हणजे या मराठी दुष्काळाबाबत कोणालाच काहीही न वाटणे. हे भयंकर आहे. मुदलात मराठी उद्योग तीन पिढ्यांच्या पुढे जास्त टिकत नाहीत. पहिल्या पिढीतील संस्थापक हाडाची काडे करून उद्योग स्थापतो. त्याचे उत्तराधिकारी तो वाढवतात.

पण त्या पुढच्या पिढीकाळात मात्र कज्जेदलाली, दूरदृष्टिहीनता वा काळाची पावले ओळखण्यातील अपयश इत्यादी कारणांमुळे उद्योगांस घरघर लागायला सुरुवात होते. त्यातील काही मराठी उद्योग मग पुढे एखाद्या अन्यभाषी उद्योजकाचा घास बनून दिसेनासे होतात. त्याच वेळी टाटा, गोदरेज, महिंद्र आदी उद्योग घराणी मात्र पिढ्यानपिढ्या टिकतात आणि फोफावतातही. मराठी माणसाच्या जनुकातच काही दोष आहे म्हणावे तर इतिहासकाली देदीप्यमान कामगिरी हा समज खोटा ठरवते. तेव्हा मराठी उद्योगजगात सर्रास दिसणारा हा तीन पिढ्यांचा तमाशा लवकरात लवकर कसा थांबवता येईल यासाठी समस्त मराठी जनांचे प्रयत्न हवेत. नपेक्षा वडा-पावची गाडी इतकीच काय ती मराठी उद्योजकांची ओळख राहील.

# जुनी बिले अदा करण्याचा सपाटा?

## पालिका आयुक्तांनी लक्ष घालण्याची मनसेची मागणी




ठाणे : लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागताच ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांची लगबग सुरू झाली आहे, ती नव्या आयुक्तांकडून घोटाळ्यातील कामांच्या बिलांची मंजूर काढत ठेकेदारांना बिल अदा करण्याची. नालेसफाईच्या घोटाळ्यात अडकलेल्या प्रकरणांची बिल काढण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर पालिकेच्या घनकचरा व लेखा विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी काढण्याचा सपाटा लावला आहे. नव्या आयुक्तांनी याप्रश्नी वेळीच लक्ष द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्निल महिंद्रकर यांनी केली आहे.

नालेसफाई कामांचे कार्यादेश नसतानाही २०२२-२३ या वर्षात ठेकेदारांनी बेकायदा केवळ दिखाव्यासाठी नालेसफाईची काही ठिकाणी कामे केली. हा कोटयवधी रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार मनसेचे स्वप्निल महिंद्रकर यांनी उघडकीस आणला. त्यानंतर तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी यासंबंधित केलेल्या कामांची बिल न काढण्याचे आदेश दिले होते. पण आयुक्त अभिजीत बांगर यांची बदली होताच महानगरपालिकेच्या घनकचरा व लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करून कार्यादेश नसलेल्या कामांची बिल काढण्याचा प्रताप घडून आणला आहे.

महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणारी नालेसफाई ही केवळ दिखाव्यापूर्ती असून प्रत्यक्षात नालेसफाईच्या नावावर फक्त हात सफाई केली जाते असा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे. ही बाब वारंवार नागरिकांच्या वतीने महानगरपालिकेला निदर्शनास आणून देण्यात आली आहे. पण तरीही महानगरपालिकेचे अधिकारी नालेसफाईच्या आड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार घडून कोटयवधी रुपयांची देयके लाटण्याचा खेळ वर्षानुवर्ष करत आले आहेत. नालेसफाईच्या कामात पारदर्शकता यावी, यासाठी तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी मोठ्या प्रमाणावर उपयोजना केल्या होत्या. गेल्या वर्षाची नालेसफाई काही प्रमाणात पारदर्शक पद्धतीने करण्यात आली होती, पण २०२२ - २३ यावर्षी झालेल्या नालेसफाईत मोठा घोटाळा झाला असून सुद्धा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आचारसंहितेचा फायदा घेऊन संबंधित कामांचे देयक अदा करण्यात व्यस्त आहेत.

> ठाणे महानगरपालिकेच्या नालेसफाईचे काम पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी, यासाठी उपयोजना आखण्याचे काम महानगरपालिकेकडून अपेक्षित असताना महानगरपालिकेचे अधिकारी संगनमत करून घोटाळे झालेल्या कामाचे देयक अदा करत आहेत, हिच शोकांतिका आहे. नव्या आयुक्तांनी याबाबतची चौकशी करावी.
> – **स्वप्निल महिंद्रकर**, ठाणे शहराध्यक्ष जनहित व विधी विभाग मनसे

# पाचबत्ती नाका–मस्जिद रस्त्याला पडले खड्डे

## अपघातांच्या घटनांत वाढ, नागरिकांसह वाहनचालक त्रस्त



जव्हार : शहरात सर्वत्र खडखड नळ पाणीपुरवठा योजनेतील नळ जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे. पहिल्या टप्प्यात योजना पूर्ण झाली आहे. मात्र पाइपलाइनसाठी रस्ता खोदल्यानंतर तो पुन्हा पूर्ववत होणे गरजेचे आहे. असे असूनही पाचबत्ती नाका ते मज्जिद रस्त्याच्या दुतर्फा खडखड नळ पाणी योजनेसाठी रस्ता खोदून त्यात पाइप बसवलेले आहेत. हे काम पूर्ण झाले, परंतु रस्त्याला पडलेले खड्डे आणि मातीवर आल्याने झालेल्या धुळीने नागरिक हैराण झाले आहेत. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार पडून जखमी झाले. तर अबालवृद्ध अपघात होऊन पडण्याच्या घटना घडल्या आहेत. कोणतेही वाहन या रस्त्यावरून गेले असता आसपासच्या परिसरात राहत असलेल्या नागरिकांना धुळीचा दैनंदिन सामना करावा लागत आहे.

धुळीमुळे सर्दी, खोकला आणि श्वसनाचे आजारही नागरिकांना जडले आहेत. यावर स्थानिक नगर परिषद प्रशासनाने योग्य कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. पाचबत्ती नाका ते मज्जिद रस्ता हा नियमित वापरात असल्याने नागरिकांसह वाहनांची नेहमी रेलचेल असते. मस्जिद परिसर असल्याने मुस्लिम धर्मीयांसाठी हा रस्ता अतिशय महत्त्वाचा आहे. नगर परिषद प्रशासनाने रस्त्याचे काम करावे, अथवा खड्डे बुजून धूळ उडणार नाही, याची उपाययोजना करावी, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

> पाचबत्ती नाका ते मस्जिद रस्त्याला लगत असलेल्या वस्तींना खडखड नळपाणी योजनेचे कनेक्शन देत असताना रस्त्याची खोदाई करण्यात आली. रस्त्याला पडलेले खड्डे व धूळ उडणार नाही, अशा सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. रस्त्याला पडलेले खड्डे भरण्याचे काम केले जाणार आहे.
> – **विशाल मोरे**, अभियंता, पाणीपुरवठा विभाग

# Taxi rides to Nashik, Shirdi, Pune from Mumbai to get dearer



Mumbai

The fare hike of share taxi services from Mumbai to Nashik, Shirdi and Pune has been approved at a transport authority meeting this week. The implementation of this will likely be in effect from next month. While the revised fare of AC taxis on the Mumbai-Nashik (175 km) and the Mumbai-Shirdi (265 km) routes will be Rs 575 and Rs 825 instead of the current Rs 475 and Rs 625 respectively, the fare of the non-AC taxis on the Mumbai-Pune (155 km) route will be Rs 500 instead of Rs 450, and for the AC taxis it will be Rs 575 instead of Rs 525. Asked if the fare hike could be implemented with the election code of conduct in place, a transport department official said, "The auto/taxi fare hike was already done a year ago but had not been implemented to these routes and was awaiting approval. For the Mumbai-Shirdi sector, the last fare hike was given in 2013. The approval has now been given of Rs 100 only for Mumbai-Nashik and Rs 50 for Mumbai-Pune.

So, it's not a new fare hike." The fare revision was approved considering the government appointment Khatua panel, set up for revision of taxis fare, and the demands made by the union of cabbies, who are operating on the routes.

# Kolkata Police Include Hardik Pandya And Rohit Sharma For QR Code Scam Post



Bengaluru

With Rohit Sharma and Hardik Pandya in the limelight for some of the wrong reasons lately, they have been included in Kolkata Police's meme post, posted for making people aware of QR code scams. Ever since Hardik Pandya took over as captain, replacing Rohit Sharma, there has been intense scrutiny on both players. Rohit Sharma led the Mumbai Indians to victory in five IPL titles, but this season, the team management opted for a new captain. However, under Hardik Pandya's leadership, Mumbai Indians have suffered defeats in their first two matches of IPL 2024. Interestingly, a photo featuring the duo has been utilized by the Kolkata Police to raise awareness about a QR code scam. The message accompanying the photo is in Bengali. The line used in the post translates to: "When you scan the QR code after listening to a fraud, Rohit is the bank account and Hardik is deceived." There has been significant speculation surrounding the dynamic between Rohit Sharma and Hardik Pandya following the change in captaincy for the Mumbai Indians ahead of the Indian Premier League (IPL) 2024 season. Hardik assumed the captaincy role, bringing an end to Rohit's decade-long tenure as MI captain after an impressive trade move from the Gujarat Titans. Despite failing to secure victory in his debut match as MI skipper, Hardik's leadership reignited discussions about potential tensions within the team. However, former Indian cricketer Robin Uthappa highlighted a positive development after the match against the Gujarat Titans that may reassure Mumbai Indians fans. Uthappa noted a lengthy conversation between Rohit and Hardik post-match, suggesting that the two players are actively engaging in constructive dialogue and exchanging ideas. "I quite like this. It's quite heartening to see the two of these guys having this conversation. I am sure the Mumbai Indians fans who want them to succeed will be enjoying this conversation. I am sure Rohit here, from what we see, is passing on information with Hardik and Hardik is listening like someone who wants to understand things. This is good news, this looks good to me. This will hold Mumbai Indians in good stead as the team moves forward," Robin Uthappa told Jio Cinema.

## उत्तरशीव येथील पेपर गोडाऊनला आग

**मुंब्रा** : बुधवारी रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास उत्तरशीव मार्ग येथील खिडकाळी स्मशानभूमीजवळ असलेल्या सागर इंटरप्राईजेस गोडाऊनला आग लागली. दर घटनास्थळी डायघर पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान फायर वाहनासह उपस्थित होते. सुदैवाने या आगीत कोणालाही दुखापत झाली नाही.या गोडाऊनमध्ये पेपर ग्लास बनवण्याच्या ३ मशीन, ए.सी. युनिट, टेबल, खुर्ची, ड्रायफूट, टिशू पेपर, पेपर ग्लास, डिश, कागदी बॉक्स, रॅपिंग पेपर, पुठ्ठा इत्यादी साहित्य पूर्णपणे जळाले. या गोडाऊनला लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांनी मध्यरात्री सव्वा वाजण्याच्या सुमारास पूर्णपणे विझवली.

# पीक कर्जावरील व्याजामुळे शेतकरी संतप्त

## व्याज भरले नाही तर हमीपत्र द्या, जाचक अटीमुळे बळीराजा आक्रमक



शासन परिपत्रक जारी करण्यापूर्वी ज्या शेतकऱ्यांनी पीककर्जाची मुद्दल भरली आहे त्यांना पुढील हंगामात वाटप होणाऱ्या कर्जातून सहा टक्के व्याज दराने वसुली करण्यात यावी,व्याजासकट मुद्दल रकमेची वसुली भरल्याशिवाय शेतकऱ्यांचे कर्ज खाते निरंक होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची भावना असून पीक कर्जावर लावलेल्या व्याजाला विरोध होत आहे. याबाबत शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असताना भरलेले व्याज डीबिटीद्वारे सहा महिन्यांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे शासनाने सुचवले असून त्यावर शेतकरी विश्वास ठेवायला तयार नाहीत.

**खर्डी** : पीक कर्जाची मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याचे शासनाचे धोरण असताना सरकारच्या नवीन आदेशा द्वारे सहा टक्के व्याजासह वसूली करण्यात यावी असे जिल्हा बँकेला निर्देश आल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातील शेतकरी मोठया प्रमाणात सेवा सहकारी संस्थे मार्फत कर्जाची उचल करून शेती करतात व मार्च अखेर शून्य टक्के व्याजदराचा फायदा घेण्यासाठी उसनवारी किंवा कष्टाने बनवलेले दाग दागिने गहाण ठेवून व्याज वाचवण्यासाठी ती परतफेड करत असतात.परंतु या वर्षी सेवा सहकारी संस्थानी सहा टक्के व्याजदराने मुद्दल रक्कम जमा करण्याचे निर्देश जिल्हा बँकेने सहकार विभागाचा दाखला देत दिले आहे.त्यामुळे मुदतीत पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सहा टक्के व्याजदराचा भूर्दंड सोसावा लागणार आहे.

शेतकऱ्यांमध्ये सरकार विरुद्ध प्रचंड संतापाचे वातावरण पसरले असून हा तुघलकी निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे. यापूर्वी खरीप पीककर्ज मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन टक्के केंद्र शासन व तीन टक्के डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत असे एकूण सहा टक्के तीन लाख मर्यादेच्या पीक कर्जासाठी व्याज सवलत दिली जात होती.परंतु १३ फेब्रुवारी रोजी पुणे येथील सहकार आयुक्त कार्यालयाकडून व्याज सवलत योजनेचे निकष बदलून सहा टक्के व्याजासह वसूली करण्यात यावी असे निर्देश जिल्हा बँकेला देण्यात आले.या निर्णयाचा आधार घेऊन जिल्हा बँकेने सेवा सहकारी संस्थांना व्याजासह वसुली करण्याचे परिपत्रक जारी केले असून जे शेतकरी व्याज भरणार नाही त्यांचे हमीपत्र लिहून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## कसारा स्थानकातील फलाट बदल थांबवा

**कसारा** : मध्य रेल्वेच्या कसारा स्थानकात उपनगरीय लोकल गाड्यांचा फलाट बदल केला जात असल्याने प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. या समस्येला वाचा फोडण्यासाठी २४ मार्च रोजी दै. 'पुण्यनगरी'च्या अंकात 'लोकलच्या फलाट बदलाने प्रवाशांची त्रेधा' अशा मथळ्याचे वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. उपनगरीय रेल्वे प्रवासी एकता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बातमी वाचल्यावर गुरुवारी मध्य रेल्वेचे प्रधान परिचालन प्रबंधकांची भेट घेतली. त्यांच्याकडे कसारा स्थानकातील फलाट बदल थांबवण्याची मागणी केली.

मध्य रेल्वेच्या कसारा स्थानकात उपनगरीय लोकलबाबत नेहमी फलाट बदल होत असतो. उपनगरीय लोकल गाड्यांसाठी कसारा स्थानकात स्वतंत्र फलाट असूनही दिवसभरातून तीन ते चार लोकल गाड्या फलाट क्र. १ आणि २ या स्थानकांमध्ये वळवल्या जातात. फलाट क्र. ४ हून १ व २ स्थानक गाठताना प्रवाशांची तारांबळ उडते. लोकल पकडण्याच्या धावपळीतून प्रवासी पाय घसरून पडत असल्याच्या घटना असतात. यातून अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी येत्या आठवड्यात रेल्वे प्रशासनाने कसारा स्थानकातील लोकल थांबा एकाच फलाटावर निश्चित करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

## लुम कारखान्यातून सामानाची चोरी

**भिवंडी** : खोणी ग्रामपंचायत हद्दीतील मच्छा कंपाऊंड मधील एका लुम कारखान्यात अज्ञात चोरट्याने प्रवेश करून कारखान्यातील सव्वा लाखाचा सामान चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी निजामपूरा पोलीस ठाण्यात आज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्याने खोणी ग्रामपंचायत हद्दीतील काटई रोड येथील मच्छा कंपाउंड मध्ये शिरून अबरार अलाउद्दीन खान यांच्या मालकीच्या लूम कारखान्याच्या खिडकीवाटे आत प्रवेश करून लूममध्ये ठेवलेले एकूण १ लाख १४ हजार २०० रुपये किमतीचे विविध प्रकारचे सामान चोरून नेले आहे.

# कसाऱ्यात शिवजयंती उत्साहात साजरी

## पोवाड्यातून उलगडली महाराजांची शौर्यगाथा



**कसारा** : ढोल ताशे आणि डीजेच्या वादनाने भारावलेले वातावरण,श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक,मुख्य बाजारपेठ व विविध विभागात सादर करण्यात आलेल्या पोवाड्यांमधून उलगडणारी शिवाजी महाराजांची शौर्यगाथा अन संपूर्ण कसारा गाव परिसरात लागलेले भगवे ध्वज आणि उत्साहात सहभागी झालेले शिवभक्त...छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचा प्रेम आणि अभिमान व्यक्त करण्यासाठी शिवप्रेमींनी विविध कार्यक्रमांतून गुरुवारी तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी केली.

कसारा गावात शिवसेना,आगरीसेना,देऊळवाडी शिवसेना विभाग,छत्रपती शिवाजी महाराज नगर आदी विभागांमार्फत मिरवणुक काढून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून शिवरायांना मानवंदना दिली. अशावेळी कसारा गावाला जणू हिंदवी स्वराज्याचे प्रतीक असलेल्या भगव्या रंगाने व्यापले होते.शिवजयंती निमित्त जयवंत घाग,रघुनाथ कदम,विनायक सावंत,गोरख गटखळ,संतोष खैर,हर्षद कदम,प्रशांत पवार यांनी देऊळवाडी विभागातील जागृत देवस्थान असलेल्या श्री हनुमान मूर्तीचे पूजन केले.तसेच आगरीसेना महाराष्ट्र राज्य सदस्य शंकर भगत यांनी आगरी सेनेच्या वतीने शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

याावेळी जयराम बेंडकुळे,गंगाराम आयरे,दत्तात्रय म्हसने,बाळू कडू,श्रावण तेलम,सुभाष म्हात्रे,दत्ता कडू,हरिश्चंद्र भागडे यांच्यासह आगरी सेनेच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली.

# मेट्रोच्या कंत्राटदारांकडे ३७५ कोटींचा मालमत्ता कर थकीत; महापालिकेने बजावली नोटीस



**मुंबई** : मुंबई महापालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाने, कोट्यवधी रुपयांच्या कर थकबाकीदार कंत्राटदार, बिल्डर, उद्योजक, सोसायटी, कंपन्या आदींना कर भरणा करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. विशेषतः मुंबईचा चेहरामोहरा बदलणाऱ्या मेट्रो रेल्वेचे जाळे मुंबईभर पसरले असून मेट्रोची कामे करणाऱ्या कंत्राटदारांकडेही पालिकेची तब्बल 375 कोटी रुपयाची मालमत्ता थकबाकी असल्याचे समोर आले आहे. मेट्रो रेल्वेची कोट्यवधी रुपयांची कंत्राट कामे चालविणाऱ्या एचसीसी - एम.एम.सी. कंत्राटदाराकडे 98 कोटी 92 लाख 41 हजार रुपये, सी.ई.सी. - आय.टी.डी. 95 कोटी 60 लाख 7 हजार रुपये, डोगा सोमा - 94 कोटी 39 लाख 81 हजार रुपये, एल एण्ड टी स्टेक - 82 कोटी 12 लाख 84 हजार रुपये, एचसीसी - एम.एम.सी. - 4 कोटी 7 लाख 63 हजार रुपये अशी एकूण 375 कोटी 12 लाख 78 हजार रुपयांची मालमत्ता करापोटी थकबाकी प्रलंबित आहे. या कंत्राटदारांनी अद्यापही ही कोट्यवधी रुपयांची थकबाकी भरलेली नसल्याने महापालिकेने या सर्व कंत्राटदारांना कर भरण्याबाबत 19 मार्च रोजी नोटिसा बजावल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आल्या आहेत. तसेच, संबंधित कंत्राटदारांनी मालमत्ता कर वेळेत भरावा, यासाठी करनिर्धारण व संकलन विभागाच्या वतीने पाठपुरावा सुरू आहे. मुंबई महापालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागाच्यावतीने वर्ष 2023-24 या आर्थिक वर्षाचे उद्दिष्टाइतके मालमत्ता कर संकलित करण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न सुरू आहेत. करनिर्धारण व संकलन विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत. 28 मार्च रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत पालिकेने 2 हजार 398 कोटींची कर वसुली केली आहे. सध्या करनिर्धारण व संकलन विभागाने मुंबई शहर आणि उपनगरांमधील मोठ्या थकबाकीदारांवर लक्ष केंद्रित केले आहे. तसेच मागील थकबाकी वसुलीसाठीबाबतही प्राधान्य देण्यात येत आहे. मुंबईत विविध ठिकाणी मेट्रोची कामे सुरू आहेत. कास्टींग यार्ड भूखंडाचा मालमत्ताकर भरण्याची करारनाम्यानुसार जबाबदारी संबंधित कंत्राटदारांवर आहे. तथापि, कंत्राटदारांकडून विलंब होत असल्याची बाब उघड झाली आहे. अखेरीस, मेसर्स एचसीसी झ्र एमएमसी, मेसर्स सीईसी झ्र आयटीडी, मेसर्स डोगा सोमा आणि मेसर्स एल एण्ड टी स्टेक या कंत्राटदारांना मालमत्ताकर भरण्याबाबत नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत.

## मुंब्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**मुंब्रा** : तिथीनुसार साजरा केल्या जाणाऱ्या शिवजयंती निमित्त मुंब्रा येथील शिवसेनेच्या मध्यवर्ती शाखेत शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. महाराजांच्या प्रतिमेला कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे व माजी नगरसेवक राजन किणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी शिवाजी महाराजांच्या विजयाच्या घोषणा देण्यात आल्या.यावेळी शिवसेना उत्तर भारतीय विभागाचे शशिराज यादव, माजी नगरसेविका अनिता किणे , मुबीन सुर्वे, प्रसिद्धी प्रमुख आरिफ हाशमी यांच्यासहित शिवसैनिक उपस्थित होते.

# अनधिकृत पार्किंगला अभय दिले जातेय का?

## उल्हासनगरातील नागरिकांचा पालिका प्रशासनाला सवाल

**उल्हासनगर** : उल्हासनगर शहरात मनपाच्या भूखंडावर कब्जा करून मोठया प्रमाणात अनधिकृत पार्किंगस्थळे उभारून जबरदस्तीने काहीजण वसूली करत आहेत. मनपा प्रशासनाने असे भूखंड ताब्यात घेऊन पार्किंगसाठी निविदा काढल्या आहेत. मात्र त्यानंतर ज्या कंपनीला रितसर पार्किंगस्थळ चालवण्यासाठी मंजुरी मिळाली आहे .त्यांच्या ताब्यात पार्किंगस्थळ देण्यास अनधिकृत पार्किंग करणारे वाले नकार देत असून आचारसंहिता लागू झाल्याने तुम्ही जमिनीचा ताबा घेऊ शकत नाही अशी दादागिरी त्यांनी सुरू केली आहे. त्यामुळे नागरिकांनी पालिका अनधिकृत पार्किंगला अभय देतेय का? असा सवाल विचारत आहे.

उल्हासनगर मनपाच्या अखत्यारितील शहाड रेल्वे स्थानक जवळ आणि उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या जवळील पश्चिम भागात अनेक वर्षांपासून मनपाच्या भूखंडांवर बेकायदा पार्किंगस्थळ उभारून काही कथित 'दादा' वसूली करत आहेत. या दादांना काही राजकीय नेत्यांचा आशिर्वाद असल्याचे बोलले जात आहे. या संदर्भात मनपा प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर अनेकवेळा प्रशासनाने हे बेकायदा स्थळ बंद करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना यश आले नाही. पालिका प्रशासनाने शहाड रेल्वे स्थानक जवळ आणि उल्हासनगर रेल्वे स्थानक जवळील पार्किंगस्थळ बाबत निविदा प्रसिद्ध केल्यानंतर या दोन्ही ठिकाणच्या पार्किंगची वसूली करण्याचा ३ वर्षांचा ठेका हा सृष्टी इंटरप्राईजेसला ई निविदा अन्वये देण्यात आला आहे . या अंतर्गत १५ मार्च पासून ठेकदारास मनपच्या मालमत्ता विभागाने पार्किंगस्थळ ताब्यात द्यायचे होते. मात्र ही कार्यवाही झालेली नसल्याचे स्पष्टीकरण सृष्टी इंटरप्रायझेस कंपनीकडून देण्यात आले आहे. दरम्यान सृष्टी इंटरप्रायझेस कंपनीकडूनआयुक्तांना एका पत्राद्वारे हे वाहनतळ ताब्यात घेऊन आम्हास हस्तांतरित करण्याची विनंती केली. परंतू मनपाने याकरता आचार संहितेची आडकाठी असल्याची सबब दिली आहे. या संदर्भात मनपा प्रशासनावर बेकायदा पार्किंगस्थळ चालविणाऱ्या व्यक्तींनी दबाव आल्यानंतरचा मनपा प्रशासनाने ही भूमिका घेतली असल्याचे बोलले जात आहे.लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता ही १६ मार्चच्या दुपारपासून लागू झाली असून याबाबत कोणतेही आर्थिक तरतुदीचे, नवीन धोरण, कार्यादेश अंमलात आणू नये असे निर्बंध आहेत.



कंत्राटा बाबत काहीही संबंध नसून मनपा प्रशासन याचा विपर्यास करून आपली जबाबदारी झटकत असल्याचे सृष्टी इंटरप्रायझेस कंपनीचे मालक एल. बी. पाटील यांचे म्हणणे आहे .या प्रकरणी मनपा निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक तत्वे मागवून पार्किंगस्थळा बाबत निर्णय घेणार असल्याची माहिती मनपाचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी दिली आहे.

# सात तोळे सोन्यासह मोबाईल रिक्षात विसरला

## पोलीसात तक्रार, रिक्षाचा शोध सुरु

**ठाणे** : पनवेल येथून ठाण्यात घर भारणीच्या कार्यक्रमासाठी ठाण्यात आल्यानंतर परतीच्या प्रवासात रिक्षाने ठाणे स्टेशनकडे निघालेल्या तक्रारदार देवेंद्र हिरालाल पाटील(५२) यांची सात तोळे सोने स्मार्टवॉट आणि मोबाईल असलेली बॅग रिक्षात विसरल्याची तक्रार ठाणे नगर पोलीस ठाण्यात गुरुवारी रोजी तक्रार दाखल केली.

तक्रारदार देवेंद्र पाटील (३१) डी. २०३, डीप सिटी उसरली,खुर्द न्यू पनवेल नवीमुंबई हे ठाण्यात भूषण पाटील यांच्या कॉसमॉस हॅबीटाईट इमारतीच्या घरभारणीच्या कार्यक्रमासाठी आलेले होते.कार्यक्रमानंतर परतीच्या प्रवासात तक्रारदार पाटील हे ठाणे स्टेशनकडे जाण्यासाठी निघाले.त्यांनी रिक्षा पकडली. रिक्षाने तक्रारदाराला शिवसागर हॉटेल कॉर्नर येथे उतरवले. रिक्षातून उतरताना मोबाईल पाहताना चुकीने एक बॅग रिक्षातच राहिली. बॅगेत ७ तोळे सोने, एक स्मार्ट वॉच आणि मोबाईल असा मुद्देमाल राहिला.लक्षात येताच तक्रारदाराने रिक्षाचा शोध घेतला. मात्र रिक्षा आढळली नाही.या प्रकरणी तक्रारदार पाटील यांनी ठाणे नगर पोलीस ठाण्यात रिक्षात बॅग राहिल्याची तक्रार नोंदवली.ठाणे नगर पोलीस हे रिक्षाचा शोध घेत आहेत.

# शहापुरात ८६ गावपाड्यांना टँकरने पाणीपुरवठा




**किन्हवली**: मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा, तानसा व वैतरणा यासारख्या तलाव असणाऱ्या शहापुर तालुक्यात सध्या पाणीटंचाई सुरू असून ११ गावे व ७५ आदिवासी पाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत असल्याची दिसून येत आहे . २३ टँकरने या गाव पाड्याना पाणीपुरवठा होताना दिसत आहे. भातसा नदीतून हे टँकरच्या माध्यमातून गाव पाड्यांना पाणी देण्यात येत आहे.

मुख्य म्हणजे मार्च महिन्याच्या शेवटी पाणीटंचाई असून येणाऱ्या दोन महिन्यात शहापुर तालुक्यात भीषण पाणीटंचाईला जनतेला सामोरे जावे लागणार आहे.उन्हाचा वाढता पारा व भीषण पाणी टंचाईमुळे शहापुर तालुक्यातील जनतेचे हाल होण्याची शक्यता आहे. मुख्य म्हणजे टँकरने पाणीपुरवठा होत असताना टंचाईचा निधी नसल्याने ठेकेदारांना उपासमारीची वेळ येण्याची शक्यता आहे.दरवर्षी शहापूर तालुक्यात भीषण पाणीटंचाई उन्हाळयात होत असते या पाणीटंचाई ला रोखण्यासाठी शासनाने भावली योजना मंजूर केली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत पंचायत समिती पाणीपुरवठा विभाग व जजीवन प्राधिकरण मार्फत नळ पाणीपुरवठा योजना शहापुर तालुक्यात मंजूर करण्यात आल्या आहेत .मात्र या योजनेची कामे सुरू असल्याने या वर्षी शहापूर तालुक्यात पाणी प्रश्न सुटणार नाही. शासनाने यावर्षी टँकरने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला असून मार्च अखेर शहापुरात ७५ आदिवासी पाडे व ११ गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे.मात्र पुढील दोन महिन्यांत गावाची व पाड्यांची संख्या वाढू शकते. उन्हाचा वाढता पारा ,पाण्याची घटलेली पातळी, बोअरवेल चा अभाव, अपूर्ण नळ पाणीपुरवठा योजना यामुळे आगामी काळात तालुक्यात भीषण पाणीटंचाई येऊ शकते. शासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक असून जिल्हा व तालुका प्रशासन व लोकप्रतिनिधीनी खबरदारीची उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# जाब विचारल्याने तरुणावर हल्ला

**ठाणे** : ठाण्याच्या वागळे इस्टेट मधील आकाश अर्जुन कोकणे( २१ ) हा आपल्या मित्रांसोबत एमआयडीसी येथील आयटीआय येथे बोलत असताना मद्य प्राशन करून आलेल्या अशोक गुप्ता याने कारण नसताना दहशत पसरवण्यासाठी तक्रारदाराच्या सोबत असलेल्या गणेश बळवी याच्या थोबाडीत मारल्याची घटना मंगळवारी घडली. त्याचा जाब विचारला असता अशोक गुप्ता आणि त्याच्या अन्य तीन सहकाऱ्यांनी चाकू आणि लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केला. वागले इस्टेट पोलीस ठाण्यात चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

आकाश अर्जुन कोकणे (२१) रा. बरखंडे चाळ, आय.टी. आय सर्कल, रोड नं.२८, वागळे इस्टेट ठाणे येथे वास्तव्यास असून घटनेच्या दिवशी मंगळवारी एमआयडीसी आयटीआय गेटजवळ मित्रांसोबत बसला असताना घटनास्थळी अशोक गुप्ता याने काहीही कारण नसताना गणेश बळवी याच्या थोबाडीत मारली. याचा जाब विचारताच अशोक गुप्ताने थांब तुला दाखवितो असे म्हणत तीन अनोळखी व्यक्तींना बोलावून गणेश याच्यावर चाकू, दगड आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला करून जीवे ठार मानायचा प्रयत्न केला. अशोक गुप्ताने चाकूने गणेश याच्या छातीवर चाकूने जखम केली आणि मारहाण केली. जखमी गणेशला उपचारासाठी मुंबईच्या सायं रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर तक्रारदार आकाश याने वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात. तक्रारदार आकाश कोकणे याच्या जबाबानुसार पोलिसांनी अशोक गुप्ता आणि तीन अनोळखी व्यक्तींच्या विरोधात प्राणघातक हल्ला प्रकरणी गुन्हा दाखल केला.

# एसटी चालक–वाहकाचा प्रामाणिकपणा

## दागिने, रोख रक्कम दिली परत



**नालासोपारा** : कराड ते रबाळे पोलीस ठाणे एक महिला लहान मुलीसह प्रवास करीत होती. ती एसटी बसमध्ये अडीच तोळे सोने आणि ८ हजारांची रोख रक्कम असलेली पर्स विसरून गेली होती. मात्र नालासोपारा आगाराचे चालक एन. के. मेश्राम व वाहक आर. एम. शेख यांनी त्यांची पर्स परत केली.

रबाळे येथील प्रतिभा निकम या नालासोपारा आगारातील बसने कोल्हापूर-नालासोपारा बसने कराड ते रबाळे मुलीसह प्रवास करीत होत्या. रबाळे येथील थांबा आल्याने लगबगीने त्या खाली उतरल्या. एसटी पुढे निघून गेल्यावर त्यांच्या लक्षात आले, की पर्स विसरलो आपण. त्यांचे नातेवाईक एसटी महामंडळात वाहतूक नियंत्रक आहेत. कराड डेपोत फोन करून चालक एन. के. मेश्राम व वाहक आर. एम. शेख यांचे फोन नंबर मिळवून पर्स बसमध्ये विसरल्याची माहिती दिली. प्रतिभा निकम यांचा फोनसुद्धा पर्समध्ये होता. त्यांनी त्या फोनवर फोन केल्यावर ती पर्स एका प्रवाशाने वाहकाकडे दिली. पर्समध्ये सोने, एक मोबाइल व रोख रक्कम दोन हजार ५०० रुपये असा ऐवज निकम यांना परत केला.

# शेतकऱ्यांच्या जमिनीतून मातीची चोरी



**खर्डी** : शहापूर तालुक्यातील गोलभन येथे स्थानिक शेतकऱ्यांच्या खरीप शेतजमिनीतून रेल्वे ठेकेदाराने माती चोरी केल्याने रेल्वे प्रशासनाविरुद्ध असंतोष व्यक्त केला जात आहे. कल्याण - कसारा रेल्वे मार्गाच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.या कामासाठी आसनगावचे पुढे जमीन असमतोल असल्याने भराव करण्यासाठी मातीची प्रचंड गरज आहे.

यासाठी अंदाजपत्रकात माती भरावाचे मूल्य समाविष्ट करण्यात आले असताना ठेकेदार माती विकत न घेता रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीतून यांत्रिक मशीनच्या माध्यमातून माती चोरत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. मध्य रेल्वेवरील खर्डी रेल्वे स्थानक शेजारी असलेल्या गोलभन गावाच्या शिवारातील नितीन घरत या शेतकऱ्याच्या सर्वे क्रमांक ४० या भातशेती पिकणाऱ्या शेतामधील माती रात्रीच्या सुमारास यांत्रिकी मशीनद्वारे चोरल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतात भला मोठा खड्डा पडला असून या शेतात कोणतेच पीक घेता येणार नाही,याबाबत बाधित शेतकऱ्याने पोलिस स्टेशन व महसूल विभागाकडे तक्रार दाखल केली आहे.

# खोटी कागदपत्रे सादर करणाऱ्याविरोधात गुन्हा

**भिवंडी** : वीज पुरवठयासाठी वीज कंपनीकडे खोटी कागदपत्रे व भिवंडी पालिकेच्या सहाय्यक आयुक्तांची बनावट सही केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भिवंडी शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभाग व शिक्षण मंडळात गेल्या काही महिन्यांपासून अधिकाऱ्यांचे बनावट सहया करून आपली इच्छित काम साध्य करून घेत आहेत. या प्रकरणी महापालिका आयुक्त प्रशासनाने चौकशी करून लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. भिवंडी शहर परिसरात वीजपुरवठा व विजबील वसुली करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनीकडे वीज मीटर परवानगी मागताना एका व्यक्तीने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक तीनचे तत्कालिन सहाय्यक आयुक्त यांची खोटी सही करून व खोटा जावक क्रमांक टाकून कागदपत्र सादर केली आहेत. मौजे नवीन कणेरी येथील महम्मुद आलम शफिउददीन शेख यांनी सरकारी खोटा दस्ताऐवज सादर करून महानगर पालिकेची व टोरंट पॉवर कंपनीची दिशाभुल केल्याचे निष्पन्न झाल्याने महापालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक तीनचे सहाय्यक आयुक्त जगदीश जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलिस ठाणे येथे महम्मुद आलम शेख या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.